महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.
पुणेविभागीय मंडळ. पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 /

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

जा.क पुविमं / माध्य शाखा क / 4178
पुणे–411005
दिनांक : 31 / 05 / 2026

प्रति

मुख्यध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा ,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

**विषय :** **माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) फेब्रुवारी / मार्च–2026 चे गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व** NSQF प्रमाणपत्र **वाटपाबाबत** तसेच जुलै, 2026 च्या परीक्षेच्या प्रिलिस्ट, रक्कम भरणा केलेले चलन **स्विकारणेबाबत.**

संदर्भ : **क.रा.मं / परीक्षा– 2 / 2268, दिनांक–30 / 05 / 2026 चे पत्र.**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) फेब्रुवारी / मार्च–2026 चे गुणपत्रक तथा प्रमाणपत्र **सोमवार दिनांक 01/06/2026 रोजी सकाळी 11.00 ते 3.00** या वेळेत खालील नमूद केंद्रावर वाटप करण्यात येणार आहे, तरी सर्व माध्यमिक शाळा व मुख्याध्यापक यांनी नोंद घ्यावी.

| अ.क. | वाटप केंद्राचे नाव | अंतर्भुत तालुके व तालुका | इंडेक्स |
|---|---|---|---|
| 1. | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005 **(11.05, 11, 12, 15,03,14,08,13)** | पुणे शहर– पुर्व | S 11.11 |
| | | हवेली | S 11.05 |
| | | पुणे शहर–पश्चिम | S 11.15 |
| | | पुरंदर | S 11.12 |
| | | भोर | S 11.03 |
| | | वेल्हा | S 11.14 |
| | | खेड | s 11.08 |
| | | शिरुर | s 11.13 |
| 2. | प्रतिभा हायस्कूल व ज्यु. कॉलेज, चिंचवड, जि.पुणे. (11.09, 10, 16) | पिंपरी चिंचवड | s 11.16 |
| | | मावळ | s 11.09 |
| | | मुळशी | s 11.10 |
| 3. | एम.ई.एस. हायस्कूल, रेल्वे स्टेशन जवळ, ता.बारामती, जि. पुणे (11.02, 04, 06) | बारामती | s 11.02 |
| | | दौंड | s 11.04 |
| | | इंदापूर | s 11.06 |
| 4. | गुरुवर्य रा.प. सबनीस विद्यामंदिर, नारायणगांव, जि.पुणे (11.01, 07) | आंबेगाव | s 11.01 |
| | | जुन्नर | s 11.07 |
| 5. | भाऊसाहेब गुंजाळ पाटील सहयाद्री विद्यालय, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर | संगमनेर | s 12.11 |
| | | अकोले | s 12.01 |

| अ.क. | वाटप केंद्राचे नाव | अंतर्भुत तालुके व तालुका | इंडेक्स |
|---|---|---|---|
| 6. | महात्मा गांधी विद्यालय, कर्जत जि. अहिल्यानगर (12.02, 03, 13) | कर्जत | S 12.03 |
| | | जामखेड | S 12.02 |
| | | श्रीगोंदा | S 12.13 |
| 7. | रेसिडेन्सीअल आर्टस, कॉमर्स अॅड ज्यु. कॉलेज, लालटाकी रोड, अहिल्यानगर (12.05, 07, 08, 12) | अहिल्यानगर शहर | S 12.05 |
| | | पारनेर | S 12.07 |
| | | पाथर्डी | S 12.08 |
| | | शेवगाव | S 12.12 |
| 08. | के. जे. सोमय्या हायस्कूल, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर (12.04, 06, 09, 10, 14) | श्रीरामपूर | S 12.14 |
| | | कोपरगाव | S 12.04 |
| | | राहूरी | S 12.10 |
| | | नेवासा | S 12.06 |
| | | राहाता | S 12.09 |
| 09. | छत्रपती शिवाजी प्रशाला, मुरारजीपेठ, जि.सोलापूर (24.01, 07, 09) | सोलापूर शहर | S 24.09 |
| | | अक्कलकोट | S 24.01 |
| | | मोहोळ | S 24.07 |
| 10. | के एन भिसे ज्यु. कॉलेज कुर्डूवाडी, ता. माढा, जि.सोलापूर (24.02, 03,04) | बार्शी | S 24.02 |
| | | माढा | S 24.04 |
| | | करमाळा | S 24.03 |
| 11. | कर्मवीर भाऊराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, मु.पो.ता. पंढरपूर, जि.सोलापूर (24.05, 06,08, 10) | पंढरपूर | S 24.08 |
| | | मंगळवेढा | S 24.06 |
| | | माळशिरस | S 24.05 |
| | | सांगोला | S 24.10 |

1- उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबधित शाळेतील मुख्याध्यापक यांनी आपल्या प्रतिनिधिंना शिफारस पत्रासह तालुकानिहाय निश्चित केलेल्या वाटप केंद्रावर वेळेत हजर राहून आपले **गुणपत्रक तथा प्रमाणपत्र** स्विकारावे व सदरच्या प्रत्येक गुणपत्रक तथा प्रमाणपत्रावरील मागील बाजूस प्राचार्यांच्या सही शिक्यासह संबंधित सर्व विद्यार्थ्यांना त्याच दिवशी दु. 3.00 वाजता वाटप करावयाचे आहे.

2- तसेच जुन–जुलै, 2026 च्या परीक्षेची प्रिलिस्ट, रक्कम भरणा केलेले चलन व त्यासंबंधित कागदपत्रे वरील वाटप केंद्रावर मंडळ प्रतिनिधीमार्फत स्विकारण्यात येणार आहे.

3- फेब्रु, 2026 परीक्षेतील श्रेणीसुधार विद्यार्थ्यांना सुधारित निकाल पाहिजे असल्यास त्याच्या पुर्वीच्या परीक्षेचे मूळ गुणपत्रक, प्रमाणपत्र, विकल्प फॉर्म व प्राचार्यांचे शिफारस पत्रासह एक महिन्याच्या आत विभागीय मंडळात समक्ष सादर करण्यात यावे.

4- **गुणपत्रक दुरूस्ती प्रस्ताव (विषय सूट, श्रेणी दुरूस्ती, विषय बदल व नावातील दुरूस्ती इ. गुणपत्रक वाटपाच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत मंडळ कार्यालयात सादर करावी.) त्यानंतर दुरूस्त्या स्विकारल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.**

(M) BRaut

(डॉ. मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – ४११ ००१

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

प्रत माहितीस्तवः– मा.सचिव राज्यमंडळ,पुणे.

D:/chafe/paripatrak

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

॥ प्रकटन ॥

विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटपाबाबत.

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर दिनांक ०८ मे, २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचे गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना सोमवार दिनांक ०१/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार असून माध्यमिक शाळांमार्फत त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रक तथा प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. याबाबत विभागीय मंडळांमार्फत सर्व माध्यमिक शाळांना सूचित करण्यात आलेले आहे.

या संदर्भात विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व संबंधित मुख्याध्यापक/विद्यार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी.

Mali

(डॉ. दिपक माळी )

सचिव

राज्य मंडळ, पुणे -०४

दिनांक- 30/०५/२०२६